# प्राचार्य प्रवर्तक व जिल्हा समन्वयक कार्यपद्धती




## प्राचार्यांची भूमिका व जबाबदारी

हा उपक्रम जास्तीत जास्त विद्यार्थीभिमुख व्हावा, यासाठी महाविद्यालयात प्राचार्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून महाविद्यालयीन समन्वयक व विद्यार्थी यांच्यामध्ये समन्वय साधत असताना करिअर कट्टा जास्तीत जास्त परिपूर्ण व्हावा, यासाठी आपण सूचना प्रतिक्रिया वेळोवेळी देत राहावे. त्याचबरोबर उपक्रमाच्यावतीने महाविद्यालय प्राचार्यांच्या नियमित बैठका आयोजित केल्या असतील, त्यामध्ये उपस्थित राहून आपल्या सूचना तसेच उपक्रमाबाबत अद्ययावत माहिती घेऊन सदर उपक्रम अधिकाधिक कार्यक्षमपणे महाविद्यालयीन स्तरावर राबवण्यासाठी समन्वयकांना व संबंधित सहकारी प्राध्यापकांमध्ये समन्वय साधण्यासाठी वेळोवेळी आढावा घेणे, अशी प्राचार्यांची महत्त्वाची जबाबदारी अपेक्षित आहे.

१. करिअर कट्टाकडून राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती आपल्या जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करणे.

२. शिक्षण सहसंचालक कार्यालय तसेच विद्यापीठ व आपल्या जिल्ह्यातील महाविद्यालय यामध्ये करिअर कट्टाच्या उपक्रमासाठी योग्य तो समन्वय साधणे.

३. प्राचार्य प्रवर्तक या नात्याने सेंट्रल पेक्षा स्थानिक नियामक मंडळांतर्गत चाललेल्या कामकाजाचे नियमन करणे.

४. करिअर कट्टाचे उपक्रम जास्तीत जास्त विद्यार्थीभिमुख व्हावेत यासाठी स्थानिक पातळीवरील समस्या व सूचना राज्यस्तरीय बैठकीमध्ये मांडणे.

५. प्रत्येक शुक्रवारी संध्याकाळी ६.०० वा. असणाऱ्या बैठकीस उपस्थित राहणे.

## जिल्हा नियोजन समिती

करिअर कट्टा अंतर्गत स्थापन करण्यात येणारे करिअर संसदेमधील किमान एक वर्ष अनुभव असणाऱ्या तालुका प्रतिनिधींमधून एक प्रतिनिधीची जिल्हा नियोजन समितीमध्ये निवड केली जाते यांची जबाबदारी प्रामुख्याने जिल्ह्यातील प्राचार्य प्रवर्तक जिल्हा समन्वयक व करिअर संसद यांच्यामध्ये दुवा साधण्याची आहे. दर आठवड्याला होणाऱ्या बैठकीमध्ये राज्य पातळीवरून ज्या सूचना येतील त्या आधारे जिल्ह्यातील करिअर संसदेच्या उपक्रमांचे नियोजन करून अंमलबजावणी करणे ही त्यांची महत्त्वाची भूमिका आणि जबाबदारी आहे. दर रविवारी सकाळी १०.०० वा. असणाऱ्या बैठकीस उपस्थित राहणे.

# जिल्हा व विभागीय समन्वयक

## करिअर कट्टा जिल्हा समन्वयक

१. दर महिन्याला एक आपल्या जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयीन समन्वयकांची बैठक घेऊन करिअर कट्टाच्या उपक्रमाविषयी आढावा घेणे व अद्ययावत माहिती देणे.

२. महाविद्यालयीन समन्वयक व प्राचार्य किंवा संस्थाचालक यांना वेळोवेळी येणाऱ्या शंकांचे निरसन करणे, आपल्या पातळीवरील या शंका निरसन करणे, शक्य नसल्यास विभागीय समन्वयक किंवा करिअर कट्टा संबंधित प्रशासकीय व्यक्तींपर्यंत प्रश्न पोहोचवून तो सोडवण्यासाठी प्रयत्न करणे.

३. सदर उपक्रम महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी महाविद्यालय स्तरावर आयोजित उपक्रमांमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणे आणि करिअर कट्टा विषयीची माहिती विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देणे.

४. उपक्रम जास्तीत जास्त यशस्वी व्हावा, यासाठी महाविद्यालयीन समन्वयक व प्राचार्य यांच्यासाठी वेगवेगळ्या परिसंवादाचे आयोजन करणे.

५. उपक्रमाच्यावतीने राज्य व जिल्हा पातळीवर होणाऱ्या वेगवेगळ्या घडामोडींची माहिती सर्वसामान्यांना व्हावी यासाठी सदर उपक्रमाची योग्य त्या माध्यमांवर प्रसिद्ध देण्यासाठी प्रयत्न करणे.

६. जिल्हा समन्वयक बैठकीमध्ये उपस्थित राहून आपल्या जिल्ह्यातील कामकाजाचा आढावा देणे आणि विभागीय समन्वयक यांच्या सहकाऱ्यांनी आपल्या विभागांमध्ये जिल्ह्याचे काम उठावदार दिसण्यासाठी प्रयत्न करणे.

७. महिना अखेरीस असणाऱ्या बैठकीस उपस्थित राहणे.

## करिअर कट्टा विभागीय समन्वयक

१. दर महिन्याला एक याप्रमाणे आपल्या विभागातील सर्व समन्वयकांची बैठक घेऊन करिअर कट्टाच्या उपक्रमांविषयी आढावा घेणे व अद्ययावत माहिती देणे.

२. महाविद्यालयीन समन्वयक व जिल्हा समन्वयक, प्राचार्य किंवा संस्थाचालक यांना वेळोवेळी येणाऱ्या शंकांचे निरसन करणे व त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करणे.

३. सदर उपक्रम महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी महाविद्यालय स्तरावर व जिल्हा स्तरावर आयोजित उपक्रमांमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणे आणि करिअर कट्टा विषयाची माहिती विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे.

४. उपक्रम जास्तीत जास्त यशस्वी व्हावा, यासाठी महाविद्यालयीन समन्वयक व प्राचार्य यांच्यासाठी वेगवेगळ्या परिसंवादाचे आयोजन करणे.

५. उपक्रमाच्या वतीने राज्य व जिल्हा पातळीवर होणाऱ्या वेगवेगळ्या घडामोडींची माहिती सर्वसामान्यांना व्हावी, यासाठी सदर उपक्रमाची योग्य त्या माध्यमांवर प्रसिद्धी देण्यासाठी प्रयत्न करणे.

६. विभागीय समन्वयकांनी बैठकीमध्ये उपस्थित राहून आपल्या विभागातील कामकाजाचा आढावा देणे आणि आपल्या विभागाचे कामकाज उठावदार दिसण्यासाठी प्रयत्न करणे.

७. महिना अखेरीस असणाऱ्या बैठकीस उपस्थित राहणे.